श्री गजानन महाराज शिक्षण प्रसारक मंडळ संचालित,

# शरदचंद्र पवार कला व वाणिज्य महाविद्यालय

डुडूळगांव, (आळंदी), पुणे. ४१२ १०५

## रॅगिंग प्रतिबंधक अधिनियम, १९९९ नुसार

विद्यार्थी फोटो

### विद्यार्थी हमीपत्र

१. मी................................................... श्री./सौ./श्रीमती................................................यांचा मुलगा/मुलगी/पाल्य आहे. मी रॅगिंग प्रतिबंधासंबंधीचा नियम आणि माननीय सर्वोच्च न्यायालय व केंद्र / राज्य सरकार रॅगिंगसंबंधी घालून दिलेले निर्देश काळजीपूर्वक वाचले व पूर्णपणे समजून घेतले आहेत.

२. मला विद्यापीठ अनुदान अयोगाची व उच्च शैक्षणिक संस्थामधील रॅगिंगच्या प्रकारावर नियंत्रण ठेवणारा कायदा २००९ची प्रत मिळाली आहे.

३. मी याद्वारे अशी हमी देतो / देते की, — मी रॅगिंगच्या संकल्पनेत येणारे कोणतेही गैरवर्तन किंवा कृती करणाऱ्यास साथ देणार नाही. मी कोणत्याही प्रकारे रॅगिंगमध्ये सहभागी होणार नाही किंवा प्रोत्साहन देणार नाही किंवा त्याबाबतचा प्रसार करणार नाही. मी कोणासही शारीरिक, मानसिक किंवा इतर कोणत्याही कारणाने दुखापत होईल असे वर्तन करणार नाही.

४. मी या हमीपत्राद्वारे असे कबूल करितो/करिते की मी कोणत्याही स्वरूपात रॅगिंगमध्ये दोषी आढळल्यास वर उल्लेख केलेल्या विद्यापीठ अनुदान आयोग कायदा व नियमातील तरतुदीनुसार मी शिक्षेस पात्र राहील.

मी. ............................................ वार ................ दिनांक...............................रोजी या हमीपत्रावर स्वाक्षरी करीत आहे.

नाव. ...................................................... वर्ग........................ स्वाक्षरी..........................

पत्ता. .............................................................................. मो. नं. ..............................

पालकांचा फोटो

### पालकांचे हमीपत्र

१. मी श्री./सौ./श्रीमती. ................................................... कु. ........................................... हयाचे/हिचे आई/वडील/पालक असून, मी रॅगिंग प्रतिबंधासंबंधीचा नियम आणि माननीय सर्वोच्च न्यायालय व केंद्र/राज्य सरकार यांनी रॅगिंग संबंधी घालून दिलेले निर्देश काळजीपूर्वक वाचले आणि पूर्णपणे समजून घेतले आहेत.

२. मला विद्यापीठ अनुदान आयोगाची व उच्च शैक्षणिक संस्थामधील रॅगिंगच्या प्रकारांवर नियंत्रण ठेवणारा कायदा २००९ ची प्रत मिळाली आहे.

३. मी आपणास अशी खात्री देतो/देते की, माझा मुलगा/मुलगी/पाल्य रॅगिंगसंबंधीच्या कोणत्याही कृतीत सहभागी होणार नाही.

४. मी या हमीपत्राद्वारे असे कबूल करितो की, जर तो/ती कोणत्याही स्वरूपाच्या रॅगिंगमध्ये दोषी आढळल्यास वर उल्लेख केलेल्या विद्यापीठ अनुदान आयोग कायदा किंवा नियम यातील तरतुदीनुसार शिक्षेस पात्र राहील.

मी. .........................................................वार ................ दिनांक.........................रोजी या हमीपत्रावर स्वाक्षरी करीत आहे.

नाव. .......................................................... स्वाक्षरी................

पत्ता. .............................................................................. मो. नं. ...................

## रॅगिंग म्हणजे काय?

कोणत्याही प्रकारचे कृत्य, जे असभ्यपणाचे व नियामांचे उल्लंघन करणारे असेल ज्यामध्ये अशाप्रकारचे शब्द बोलणे, लिहिणे व तसेच असभ्यपणाची वागणूक होईल मानसिक इजा पोहचेल विदयार्थी किंवा कनिष्ठ विद्यार्थ्यांमध्ये भीतीची भावना निर्माण होईल असे वर्तन करणे की, ज्याचा परिणाम एखादयाला त्रासदायक ठरतो. याशिवाय त्या विद्यार्थ्यांना अशा प्रकारची कृती करण्यास सांगणे, जो ते करू शकत नाही किंवा ज्यामुळे त्यांच्यावर मानसिक किंवा शारीरिक दृष्टीने वाईट परिणाम होईल. अशी लज्जास्पद व अडचणीत आणणारी कृती करण्यास भाग पाडणे म्हणजेच 'रॅगिंग' होय.

१. रॅगिंगला प्रोत्साहन देणे किंवा मदत करणे. २. रॅगिंगचे कट – कारस्थान करणे किंवा त्यात सहभागी होणे. ३. बेकायदेशिर सभा घेणे व दंगा करणे. ४. महाविद्यालयातील कोणाच्याही मालमत्तेचे नुकसान करणे. ५. सभ्यता व नैतिकतेचे उल्लंघन करणे. ६. शारीरिक ईजा, दुखापत किंवा भयंकर ईजा करणे. ७. एखादयावर चुकीच्या कामासाठी दबाव आणणे. ८. गुन्हेगारी मार्गाचा अवलंब करून जबरदस्ती करणे. ९. हल्ला करणे, लैगिंक अत्याचार किंवा अनैसर्गिक कृत्य करणे. १०. पिळवणूक करणे. ११. बेकायदा अतिक्रमण करणे किंवा महाविद्यालयात गुन्हेगार प्रवत्तींच्या व्यक्तींना आणणे. १२. मालमत्तेचे नुकसान करणे. १३. धमकी देणे किंवा दहशत बसविणे. १४. वरील सर्व कृत्यांपैकी एखादे कृत्य बळी पडलेल्या व्यक्तीविषयी करणे. १५. रॅगिंग या संकल्पनेत येणारे सर्व प्रकारची कृत्ये.

## शिक्षेचे स्वरूप

**१. महाविद्यालयस्तरावरील शिक्षा:**

गुन्ह्याचे स्वरूप व गांभिर्य लक्षात घेऊन रॅगिंग प्रतिबंधक समितीच्या निर्णयानुसार गुन्हेगारास खालीलपैकी कोणतीही एक किंवा त्यापेक्षा जास्त शिक्षा होऊ शकते. महाविद्यालयातील प्रवेश रद्द करणे. २. तात्पुरते वर्गात बसू न देणे. ३. शिष्यवृत्ती रद्द करणे किंवा काढून घेणे/नाकारणे. ४. परीक्षा पासून वंचित ठेवणे. ५. निकाल राखूण ठेवणे. ६. प्रादेशिक, राष्ट्रीय किंवा आंतरराष्ट्रीय स्पर्धा व सांस्कृतिक कार्यक्रमातून काढून टाकणे/प्रतिबंध करणे. ७. वसतिगृहातून हकालपट्टी करणे. ८. रॅगिंग केलेल्या कालावधीमध्ये होणाऱ्या सेमीस्टर परीक्षा पासून वंचित ठेवणे. ९. महाविद्यालयातून हकलपट्टी करणे. व इतर कोणत्याही महाविद्यालयात प्रवेश न मिळू देणे. १०. रू. २५०००.००(रूपये पंचवीस हजार) दंड करणे. ११. दोन वर्ष सक्त मजुरीची शिक्षा होऊ शकते.

**२. सार्वजनिक शिक्षा :**

एखाद्या प्रसंगी रॅगिंगचा गुन्हा घडलेला असेल परंतु संबंधित व्यक्तीची ओळख होत नसेल तर महाविद्यालयात रॅगिंग करणाऱ्या शक्यता दर्शक गटाला सार्वजनिक शिक्षा होऊ शकते.